# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७७६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/११/२०१६

**१) मोटार सायकलच्या धडकेत एकाचा मृत्य व एक जखमी. : –**

दिनांक २५/११/२०१६ चे १८.१५ते १८.३० वा. दर. यातील आरोपी ट्रॅक्टर क्र. एमएच. ३६ डी ९००६ चा चालक गोवर्धन दयाराम चिचमलकर वय २८ वर्ष रा. भावड याने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन समोरून येणाऱ्या मोटार सायकल क्र. एमएच ३३/५९८५ ला धडक मारून यातील मृतक शरद काशीराम डोये वय २० वर्ष रा. घोडेझरी याचे मरणास व मागे बसलेल्या नितीन नारायन सुर्यवंशी वय २८ वर्ष रा. तावसी यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना मुंजमकर पोस्टे लाखांदुर यांचे चौकशी अहवालावरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३०४(अ),२७९,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी निंबेकर पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

**२) टवेरा चार चाकी वाहणाच्या धडकेत दोघे जखमी:–**

दिनांक २६/११/२०१६ रोजी १०.३० वा. दर. यातील फिर्यादी सौ. अर्चणा संदीप हरकंडे वय २८ वर्ष रा. नुतन कन्या शाळेजवळ, ही आपले पती व मुलासह मोटार सायकल क्र. एमएच ३६ डी २४६९ ने पांठराबोडी येथे जात असता नेरी ते पिंपळगाव जाणा–या सुर नदीचे पुलावर यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहण भरधाव वेगाने ,निष्काळजीपने व हयगयीने चालवुन मोटार सायकल ला समोरून धडक दिल्याने फिर्यादी,फिर्यादीचा पती – संदीप बिसन हरकंडे वय ३२ वर्ष यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७,३३८, भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. हलमारे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) स्कुटीची मोटार सायकलला आमोरासमोर धडक मारून जखमी झाल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक २६/११/२०१६ रोजी १८.०२ वा. दर. यातील मोटार सायकल क्र. एमएच २०६२ च्या चालकाने व बिना नंबर यामा अल्का कंपनीची स्कुटी निळया रंगाची चालकाने आपआपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने ,निष्काळजीपने आमोरासमोर धडक मारून एकमेकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे पोना सार्वे यांचे डॉ. रिपोर्ट व चौकशी अहवाला वरून पोलीस स्टेशन जवाहनगर येथे कलम २७९,३३७,३३८, भादंवि. सहकलम १८४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना सार्वे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) ऍक्टीव्हा गाडीची सायकलला धडक लागुन एक जखमी,व फॅक्चर झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/११/२०१६ रोजी १०.३० वा. दर. यातील फिर्यादी दुर्योधन महादेव निंबार्ते वय ५५ वर्ष रा.नेहरू वार्ड बेला यांची मुलगी कु. एकता निबार्ते वय २४ रा. बेला ही भंडारा येथे जाण्याकरीता रोडाची बाजुला सायकल घेवुन उभी असतांना यातील आरोपीने आपल्या ताब्यातील वाहण भरधाव वेगाने ,निष्काळजीपने व हयगयीने चालवुन सायकलला एनएच ०६ रोड पुलीया जवळ बेला येथे धडक दिल्याने जखमीच्या हाताला, तोंडाला मार लागुन फॅक्चर झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८, भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी गायकवाड पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

५) अवैध दारु अडयांवर धाडी .  :–

दिनांक २६/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, जवाहरनगर, कारधा ,गोबरवाही ,अडयाळ येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४३ लिटर हातभट्टी + सडवा मोहा + साहीत्य कि. ५३००/–रू. व ३६० मिली लिटर देशी दारू कि. १००/–रू असा एकुण कि. ५४००/ –रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. 9850274064

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता